# आपले सरकार केंद्र चालकांनी १२ संप्टेबरपर्यंत अर्ज करावे- आधार नोंदणी संच वितरण

## महत्त्वाची सूचना

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०८सप्टेंबर:** माहिती व तंत्रज्ञान विभाग मंत्रालय, मुंबई यांचे कडून भंडारा जिल्ह्याकरिता आधार नोंदणी संच प्राप्त झाले असून त्या आधार नोंदणी संचाचे वाटप करावयाचे आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यातील महसुल मंडळात ज्या ठिकाणी आधार केंद्र नाही आधार केंद्र सुरु करण्याचे निर्देश शासनाकडून प्राप्त आहेत. त्यानुसार भंडारा जिल्ह्यातील रिक्त महसूल मंडळामध्ये आधार संच वितरण करण्यात येणार आहे.

या संदर्भात पात्र आपले सरकार केंद्र चालकांनी जिल्हाधिकार अधिकृत वेबसाइट www.bhandara.gov.in वर जाऊन अर्जाचा नमुना, पात्रतेचे निकष, रिक्त महसुल आवश्यक अधिक माहिती डाउनलोड करून घ्यावी. भंडारा जिल्ह्यातील आपले सरकार केंद्र चालकांनी अर्ज व आवश्यक कागदपत्रे १२ संप्टेबरपर्यंत सायंकाळी ०६.०० वाजेपावतो https: // forms.gle/boBzJFVM या गूगल लिंक वर पाठवावे. सदर अर्ज भरण्याकरीता कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी,

तसेच आधार केंद्र नमुना अर्ज कोणत्याही कार्यालयात प्रत्यक्षरित्या (Hard-Copy) स्विकार तसेच वर नमूद केलेल्या लिंक सोडून कोणत्याही दुसऱ्या लिंक अथवा कुठेही अर्ज स्वीकारले जाणार घ्यावी. तसेच वरील कालावधीत अर्ज केलेल्या आपले सरकार सेवा केंद्राचालकाचा अर्ज सदर आधार कें निकष तपासुन निकषात बसत असणाऱ्या अर्जदाराचा अर्जावर जिल्हा सनियंत्रण समिती मार्फत निर्णय घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी सावनकुमार यांनी कळवले आहे.

# भंडारा जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा संपन्न



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०८सप्टेंबर:** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हा परिषद भंडारा यांच्या वतीने हेमंत सेलिब्रेशन, भंडारा येथे भव्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे अध्यक्षस्थान माननीय आमदार राजूभाऊ कारेमोरे (तुमसर-मोहाडी विधानसभा क्षेत्र) यांनी भूषविले.

कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिलिंद कुमार साळवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समित्यांचे सभापती-उपसभापती, पंचायत समिती सदस्य, सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी तसेच जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी आमदार कारेमोरे यांनी गावागावात पायाभूत सुविधा निर्माण, स्वच्छता, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, महिला व बालक विकासावर भर देण्याचे आवाहन केले. ग्रामपंचायतींमध्ये डिजिटल कार्यप्रणाली वाढवून लोकसह भागातून जबाबदार कारभार घडवून आणणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. 'माझे गाव समृद्ध करायचे ठरवले तर कोणतीही अडचण अडथळा ठरणार नाही. आजच्या कार्यशाळेतून मिळालेले मार्गदर्शन गावोगावी नेऊन समृद्धीची नवी पहाट उभी करू या. भंडारा जिल्हा अभियानाचे आदर्श केंद्र बनेल,' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी साळवे यांनी प्रास्ताविक मांडतांना सांगितले की, या अभियानामुळे ग्रामपंचायतींना गावांचा सर्वांगीण विकास साधण्याची नवी संधी उपलब्ध झाली आहे.

जिल्ह्यातील सात पंचायत समित्या व ५४१ ग्रामपंचायतींनी उत्साहाने सहभाग घेऊन राज्यस्तरीय पारितोषिक मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उपमुख्य कार्यकारी अधिकारी उमेश नंदागवळी यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यशाळेमुळे भंडारा जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना समृद्धीच्या नव्या वाटा खुल्या झाल्या असून गावागावात विकासाचा नवा आदर्श निर्माण करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेत अनुराग महाविद्यालयाचे यश



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०८सप्टेंबर:** प्रगती महिला कला महाविद्यालयात आयोजित आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक युवा महोत्सवात अनुराग अध्यापक महाविद्यालय वरठी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. राष्ट्र संवर्धनात युवकांची भूमिका या विषयावर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत नूतन सुरेश गोंडाणे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. विकास सुभाष ठवकर यांनीही आपल्या विचारपूर्ण मांडणीने उपस्थितांची दाद मिळवली.

समुहनृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी धार्मिक विषयावर आधारित मनमोहक नृत्य सादर करून द्वितीय क्रमांक मिळवला. या संघामध्ये प्राची श्रीकृष्ण बाभरे, मीना धनराज पुराम, राणु धरमसिंग जोग, निकिता दिलीप नेरकर, नूतन सुरेश गोंडाणे व तेजस्विनी राजू नागरे यांचा समावेश होता.रांगोळी स्पर्धेत संचित अनिल टिचकुले आणि उत्कर्षा संजय चौधरी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संगीता लोही,प्रा. सुनंदा आंबिलकर, प्रा. डॉ. किरण येळणे, प्रा. मृणाल माकडे,प्रा. भावना डुंभरे,अदिभा पठाण, संचित टिचकुले व आंचल भोंडेकर यांनी अभिनंदन केले.

# अकरा दिवसीय भव्य श्री गणेशोत्सव साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०८सप्टेंबर:** श्री सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ सिताराम बाबा चौक सेंदुरवाफा च्या वतीन दि.२७/०८/२०२५ ते ०६/०९/२०२५ दरम्यान सार्वजनक बाल गणेश उत्सव मंडल सिताराम बाबा चौक सेंदुरवाफा येथे ११ दिवसीय भव्य श्री गणेश उत्सव साजरा करण्यात आला दि.२७ ऑगस्ट ला मूर्ती दाते श्री लोकेशजी लांजेवार यांच्या हस्ते श्री गणेश मूर्तीची स्थापना व घट स्थापना करण्यात आली.

दि.२७ ऑगस्ट ते ०६ सप्टेंबर दररोज वेग वेगळे सांस्कृतिक , भजन असे कार्येक्रम घेण्यात दि.०६ ला दुपारी काल्याचा कार्येक्रम घेण्यात आला यावेळी दही हंडीचे पूजन करून माजी नगरसेवक श्री रविभाऊ परशूरामकर, माजी नगरसेवक मनीष कापगते, श्री पंकज मुंगुलमारे, सौ धन्वंता राऊत माजी नगराध्यक्ष, गीताबाई बोरकर, श्री लोकेशजी लांजेवार, यांच्या हस्ते दही हंडी फोडण्यात आली.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष श्याम मेश्राम, उपाध्यक्ष मनोज मेश्राम, सचिव महेश निंबेकर, सहसचिव योगेश बोरकर, सांस्कृतिक प्रमुख हितेश कापगते, अविनाश मेश्राम, व्यवस्थापक योगेश बोरकर, व मंडळाचे संपूर्ण सदस्य उपस्थित होते दुपारी ३.०० वाजे नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी हजारोच्या संख्येनी श्री गणेश भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# वैनगंगा शारीरिक शिक्षण महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०८सप्टेंबर:** वैनगंगा बहुउद्देशीय विकास संस्था, नागपूर संचालित वैनगंगा शारीरिक शिक्षण महाविद्यालय, साकोली येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील चतुर्वेदी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून झाली. यानंतर प्राचार्य डॉ. चतुर्वेदी यांनी विद्यार्थ्यांना डॉ. राधाकृष्णन यांच्या कार्य व विचारसरणीविषयी सविस्तर माहिती दिली.

आपल्या प्रास्ताविकात ते म्हणाले की शिक्षण हे समाज परिवर्तनाचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. शिक्षक हे ज्ञान, संस्कार, शिस्त आणि नैतिकतेचे धडे देऊन विद्यार्थ्यांचे जीवन समृद्ध करतात तसेच करिअरची योग्य दिशा दाखवतात.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित डॉ. जितेंद्रकुमार ठाकूर यांनी सांगितले की विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून त्या भविष्याचा पाया रचण्याचे कार्य शिक्षक करतात. शिक्षक हे मार्गदर्शक, प्रेरणादायी आदर्श असून ते विद्यार्थ्यांची क्षमता, आवड व योग्यता ओळखून त्यांच्या सर्वांगीण विकासाला हातभार लावतात. आधुनिक शिक्षण पद्धतीत शिक्षक हा केवळ अध्यापक न राहता पालक, नेता, कलाकार, शास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, सल्लागार व निष्पक्ष निर्णायक अशा विविध भूमिका पार पाडतो, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. निरज अतकरी यांनी केले तर आभार प्रदर्शन पुखराज लांजेवार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. अजय कांबळे,डॉ. राजश्री,डॉ.संदीप भगत, डॉ. राकेश शेजवाल, डॉ. सुनील कापगते, डॉ. सुनील अकोलेरकर, शिवानी पवार, साहिद सय्यद, रश्मी टिकेकर तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले.

# किन्ही (एकोडी) येथे शिक्षक दिन



**किन्ही (मोखे) दि.०८सप्टेंबर:** साकोली पंचायत समितीच्या एकोडी केंद्रांतर्गत येणाऱ्या जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा किन्ही/एकोडी. येथे शिक्षक दिनानिमित्त वैशिष्ट्य पूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. किन्ही (एकोडी) जिल्हा परिषद शाळेत शिक्षक दिनी स्वयंशासना अंतर्गत विद्यार्थ्यांनी शाळेतील संपूर्ण पदाचा कार्यभार घेत मुख्याध्यापक, शिक्षक, कारकून , परिचर आदी पदाच्या एक दिवसीय भूमिका जबाबदारी पूर्वक पार पाडल्या. इयत्ता चौथी,पाचवी, सहावी, सातवीचे विद्यार्थी शिक्षकांनी शाळेचे संपूर्ण व्यवस्थापन परिपाठ, तासिका, नोटीस काढणे, मध्यान्ह भोजन व शाळेतील इतर कामाची जबाबदारी सांभाळली. स्वयं शासनात सहभागी विद्यार्थांना भेट वस्तू देऊन मुख्याध्यापक कालिदास डोंगरवार व सर्व शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# प्रोग्रेसिव्ह इंग्लिश शाळेत शिक्षक दिवस साजरा




**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०८सप्टेंबर:**प्रोग्रेसिव्ह इंग्लिश स्कूलमध्ये शाळेचे मुख्याध्यापककु.निशा मने, उपमुख्याध्यापिका सौ. सुहानी पशिने, शिक्षिका संगीता मानापुरे यांच्या उपस्थितीत ५ सप्टेंबर २०२५ गुरुवारला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला माल्यपर्ण करून शिक्षक दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिननिमित्त शाळेचे प्राचार्य निशा मने यांनी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि जे विद्यार्थी भावी शिक्षकाची वेशभूषा करून आलेले होते सर्वांना शिक्षक दिन्याचा शुभेच्छा देऊन एक योग्य विद्यार्थी मार्गदर्शक, ज्ञानवंत, शिलवान असे विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न अध्यपनातून करणे गरजेचे आहे अशा प्रकारे विचार मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता शिक्षिका सौ. कविता बसेशंकर, मोनिका गोखले, रुबिया पटेल, हेमलता येवले, मालू थोटे, मौसमी सिसोदिया, प्रेमश्री उके, प्रांजली मरघडे, रागिणी मुने, लता लीमजे, सोनल मिश्रा, रचना गलानी, दुजन्य गणवीर, सुनीत मेश्राम, सुयोग जांभूलकर, राजकुमार लोणारे, अनिलकुमार बैगा आणि सर्व कर्मचारी यांनी अथक परिश्रम केले व शेवटी मिठाई वाटण्यात आले.

# द लॉड्र्स पब्लिक स्कूलमध्ये श्रद्धा, सौहार्द आणि कृतज्ञतेचा त्रिवेणी संगम

## गणेशोत्सव, ईद मिलाद आणि शिक्षक दिनाचा अनोखा सोहळा



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा दि.०८सप्टेंबर:** शहरातील द लॉड्र्स पब्लिक स्कूलमध्ये गणेशोत्सव, ईद मिलाद आणि शिक्षक दिनाचे संयुक्त आयोजन उत्साहात पार पडले. या विशेष सोहळ्यात विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रमुख अतिथी म्हणून सीएओ डॉ. आशीष पालीवाल उपस्थित होते. प्राचार्य सुनंदा साठे, प्रशासक राजेश जगनिक आणि पर्यवेक्षक अरुणा राऊत यांच्यासह शिक्षकवृंद आणि विद्यार्थी या कार्यक्रमाला लाभले. कार्यक्रमाची सुरुवात गणेशपूजन आणि विद्यार्थ्यांच्या गणेश वंदनेने झाली. त्यानंतर ईद मिलादनिमित्त पैगंबर मोहम्मद यांच्या जीवनावर माहितीपूर्ण सादरीकरण झाले. दोन्ही उत्सवांच्या माध्यमातून सर्वधर्म समभाव आणि बंधुभावाचा संदेश दिला गेला. शिक्षक दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी भाषण, गीत, नृत्य आणि नाट्यप्रयोगांद्वारे आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मनोगतातून गुरुजनांविषयीचा आदर स्पष्टपणे जाणवला. डॉ. आशीष पालीवाल यांनी श्रद्धा, संयम आणि शांततेचा संदेश समाजात रुजवण्याचे आवाहन केले. त्यांनी शिक्षक हे ज्ञान आणि संस्कारांचे शिल्पकार असल्याचे अधोरेखित केले. प्राचार्य सुनंदा साठे यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे कौतुक करत एकात्मता व सांस्कृतिक जागरूकता वृद्धिंगत करण्यावर भर दिला. प्रशासक राजेश जगनिक यांनी शिस्त व नियोजनाचे महत्त्व स्पष्ट केले, तर पर्यवेक्षक अरुणा राऊत यांनी शिक्षक-विद्यार्थी सुसंवादाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी गणेशभक्तिगीत, कव्वाली, गुरुस्तवन आणि नृत्य सादर केले. उपस्थितांनी या कलाविष्कारांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शेवटी शिक्षकांचा सत्कार करून विद्यार्थ्यांनी शुभेच्छापत्रे भेट केली. या अनोख्या संयुक्त आयोजनामुळे शाळेत श्रद्धा, सौहार्द आणि कृतज्ञतेचे वातावरण फुलले.

# डॉ.सर्वोपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी




**महासागर प्रतिनिधी**

**साकोली दि.०८सप्टेंबर:** स्थानिक अकॅडमिक हाईट्स पब्लिक स्कूल (एकोडी रोड) साकोली येथे दि.५ संप्टेंबर २०२५ शुक्रवारला डॉ.सर्वेपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ.सर्वेपल्ली राधाकृष्णन आणि विद्येची देवता माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पुजन करून माल्यार्पन शाळा व्यवस्थापक जी.एच.ठाकरे,प्राचार्या डॉ.संचिता ब्रह्मचारी, उपप्राचार्या डॉ अमितोज कौर ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

शिक्षक दिनाचे औचित्य साधुन विद्यार्थ्यांनी डॉ .सर्वेपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन चरित्रावर भाषणे दिली . नाट्य अभिनय, समुहगित नृत्याचे सादरीकरण केले. तसेच विद्यार्थ्यांनी स्वंयस्फुर्तीने स्वंयशासन शिक्षकाची भूमिका निभवुन अध्यापनाचे अमुल्य कार्य केले सर्व शिक्षिका,शिक्षक बांधवांना सन्मानित करून शुभेच्छा दिल्या . तर प्राचार्या डॉ.संचिता ब्रम्हचारी ह्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हटले की,सर्वोत्तम विद्यार्थी घडविण्याचे कार्य शिक्षकांकडून होत असते.म्हणुन प्रत्येक शिक्षकाने आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्याचे ध्येय अंगीकृत केले पाहिजेत. विद्यार्थ्यांनी जिवनात यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेवून ध्येय प्राप्ती करावी.असे त्यांनी प्रतिपादन केले .

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी कुंदन रामटेके,केतन हत्तीमारे,राम धुमारे,किरण ठाकुर, धनराज मेश्राम,सचिन मारवाडे, निखिल निर्बेकर, निशिकांत माटुरकर, मोहन रहीममतकर,भुपेंद्र हेमणे,दिव्या हटवार, कल्पना कापगते, राधा मेढें, नंदा कापगते,सारीका ठाकरे, शिवाली गुप्ता,प्रिती धुर्वे,मयुरी हटवार,श्रुणाली जंवजाळ, ममता सरोदे,लता कटरे,दिक्षा गेडाम, आभा पंचभाई पुनम वाडीभस्मे,रेश्मा ढोमणे,शैला धनजोडे, अंकिता गजभिये,योगिता भेंडारकर, छाया राऊत,अलविया पठाण ह्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. कनिष्का येरोला,रिया वाडीभस्मे ह्यांनी केले.तर आभार प्रदर्शन कु. लेखी पुस्तोडे ह्यानी मानले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगिता ने करण्यात आली .

## संजय गाधी निराधार योजना शिबीराचे आयोजन

**भंडारा :** संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येत असुन माहे डिसेंबर,२०२४ पासुन योजनेअंतर्गत लाभार्थ्यींना मिळणारे अनुदान डी.बी.टी. प्रणालीव्दारे लाभार्थ्यींचे खात्यात जमा करावयाचे असल्याने डी.बी.टी. प्रणालीमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे, तसेच आधार कार्ड व मोबाइल क्रमांक त्यांचे बँक खात्यासह लिंक करणे आवश्यक आहे. करीता तालुकास्तरावर शिबीराचे खालीलप्रमाणे नियोजन करण्यात आलेले आहेत.

## कोर्ट विद्यमान तहसिलवार तथा तालुका दंडाधिकारी, साकोली यांचे कार्यालय मौजा सानगडी प.ह.नं.दिनांक ८/९/२०२५

-जाहिरनामा-

लालचंद ईस्तारी वासनिक रा.सानगडी ता. साकोली जि. भंडारा

विरुध्द

निबंधक/ सचिव, (जन्म-मृत्यूनोंदणी)ग्रा.पं.कार्यालय, विहीरगांव/बुराड्या

ज्याअर्थी अर्जदार लालचंद ईस्तारी वासनिक रा.सानगडी ता. साकोली जि. भंडारा येथील रहिवासी असून अर्जदार त्यांचा मुलगा नामे अनिरुध्द लालचंद वासनिक जन्म -मौजा विहीरगाव/बुराड्या ता. साकोली जि. भंडारा येथे दिनांक ०७/०७/१९७८ ला झालेला असल्याने त्यांनी ग्रा.पं. कार्यालय, विहीरगाव/ बुराडया येथे जन्माची नोंद घेण्यासाठी जन्म व मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत कायदेशीर जम्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र मिळण्याकरिता या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे .आणि ज्याअर्थी उक्त जन्माची नोंद घेऊन प्रमाणपत्र देण्याचे योजिले आहे. त्याकरीता दिनांक १२/०९/२०२५ही पेशी तारीख सुनावणीसाठी निश्चीत करण्यात आली असून सुनावणी तहसिल कार्यालय, साकोली येथे सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. त्याअर्थी याद्वारे जाहीर करण्यात येते की, ज्या कोणाचे अनिरुध्द लालचंद वासनिक रा.सानगडी याचे जन्माची नोंद मौजा विहीरगाव/बुराड्या येथील ग्रा.पं. सानगडी ता. साकोली जि. भंडारा गेथे जन्माची नोंद करण्या संबंधान कुणाची हरकत / आक्षेप सादर करावयाचे असेल तर त्यांनी स्वतः जातीने किवा अभिकर्ता यांचे मार्फत जाहीरनामा प्रकाशित होण्याचे तारखेपासून ०१ महिण्याचे आत सदर न्यायालयात हजर राहून उजर तक्रार /आक्षेप अर्ज सादर करावे. विहीत मुदतीत उजर तक्रार / आक्षेप न कळविल्यास संबंधित वरील अनिरुध्द लालचंद वासनिक रा.सानगडी ता. साकोली कि, भंडारा यांचे जन्माची नोंद घेऊन तसे प्रमाणपत्र देण्यासाठी संधितांना आदेशित करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ४/०८/२०२५ रोजी माझ्या सहीने व शिक्यानिशी दिले.

स्थळ- साकोली तहसिलदार तथा

दिनांक-८/९/२०२५ तालुका दंडाधिकारी, साकोली

RNI No.-MAHAMAR-2010/35801 महासागर भंडारा **मालक, मुद्रक, प्रकाशक** -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर -१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन -०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

# बिरसी ग्रामसभेने घेतला गावात दारूबंदीचा ठराव

**खातिया :** येथील गावकऱ्यांनी १ सप्टेंबर रोजी आयोजित ग्रामसभेत गावात संपूर्ण दारुबंदी करण्याचा निर्णय घेत तसा ठराव एकमताने पारीत केला. गावात अवैध दारु विक्री व अमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर दंडात्मक व कठोर कारवाई केली जाणार आहे.

ग्रा.पं. प्रशासन, दारूबंदी महिला समिती, युवा समिती, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, ग्राम दक्षता समिती व रावणवाडी पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त पुढाकाराने गावात दारुबंदीचा ठराव घेण्यात आला. ग्रामसभेपूर्वी गावात व्यसनमुक्त गाव संकल्पना राबविण्यासाठी जनजागृती रॅली काढून गावकऱ्यांना व्यसनामुळे होणारे दुष्परिणामांची माहिती देण्यात आली. यावेळी सरपंच उमेशसिंह पंडेले, ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र बोरकर, पोलिस पाटील महेश सहारे, दारूबंदी महिला समितीच्या अध्यक्ष उषा गायधने, ललिता मुंडेले, उपाध्यक्ष सुनंदा तावाडे, पूजा तावाडे, युवा दारूबंदी समितीचे अध्यक्ष विकास भांडारकर, जगदीश नंगेले, उपाध्यक्ष प्रवीण सोनवने, सचिव विशाल तावाडे, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष नत्थू शेंडे सर्व सदस्य, महिला बचत गटाच्या पदाधिकारी उपस्थित होते. जनजागृती रॅलीनंतर ग्रामसभा घेऊन ठराव पारित करून संपूर्ण गाव परिसरात दारुबंदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. गाव तसेच गावाच्या सीमेत येणाऱ्या सर्व अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. नियमांचे उल्लघंन करणाऱ्यांवर ग्रामपंचायत, तंटामुक्त समिती, दारुबंदी समिती व रावणवाडी पोलिसांच्या माध्यमातून कारवाई करण्यात येणार आहे.

# मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देवू नका

## अन्यथा तिव्र आंदोलन, राज्य शासनाला निवेदन

**आमगाव/अर्जुनी मोर. :** महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षणाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने २ सप्टेंबर रोजी काढलेला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय मराठआ समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा-कुणी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपद्धती वहित करण्याबाबत काढलेल्या निर्णय, हा ओबीसी समाजावर अन्याय कारणार आहे. तसेच पुन्हा सरकारने सगेसोयरेंच्या माध्यमातुन ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचे काम राज्य शासनाने केले आहे. तो शासन निर्णय त्वरीत रद्द करण्यात यावे . अशी मागणी करीत तिव्र विरोध केला जात आहे. दरम्यान अर्जुनी मोरगाव व आमगाव तालुक्यातील सकल ओबीसी समाज व ओबीसी संघटनांच्या वतीने मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविले आहे.

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात आरक्षण सीबीसी-२०२५/प्र.क्र.१२९/मावक, २ सप्टेंबर अन्वये हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी किंवा मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याबाबत काढलेला निर्णय हा ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहे. दरम्यान राज्य शासनाला तो निर्णय मागे घ्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. महाराष्ट्रामध्ये मराठा आरक्षणावरुन सुरु असलेल्या आंदोलनावर आम्हाला चिंता आहे.मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत कोणताही निर्णय घेतल्यास त्याचा थेट परिणाम ओबीसी समाजावर होणार आहे. आम्ही कोणत्याही परिस्थितीत मराठा समाजाला असंविधानिक पध्दतीने ओबीसी प्रवर्गात आरक्षण देण्याच्या विरोधात आहोत.त्यामुळे ओबीसी समाजाच्या हक्कांवर गदा होईल,याची सरकारने काळजी घेत सदर निर्णय मागे घ्यावे अशा मागणीचे निवेदन उपविभागीय अधिकारी वरुणकुमार शहारे यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी तालुका ओबीसी संघटनेचे ललीत बाळबुद्धे व संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

त्याच प्रमाणे आमगाव येथे सुद्धा तिव्र विरोध दर्शविण्यात आले. दरम्यान शकल ओबीसी समाजाच्या वतीने ४ सप्टेंबर रोजी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री मंत्र्यांना निवेदन पाठविण्यात आले. तसेच मागणी मान्य न झाल्यास येत्या काळात विरोट मोर्चा काढून रस्काको आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. यावेळी गुरुदास येडेवार, प्रभाकर दोनोडे, सावन कटरे, तिरथ येटरे, संजय बहेकार, भुमेश शेंडे, बालु वंजारी, हिमालय येळे, धिरज ठाकरे, चंद्रकुमार बहेकार, बालु गायधने, ओमप्रकाश लांजेवार, विशाल रहांगडाले, ललीतकुमार बाळबुद्धे, शंकर लोगडे, दुलीचंद लांजेवार, श्रीकांत डोंगरवार, रमेश लाडे, दर्शना लाडे, श्रावण मेंढे, महेश उके, जगदीश चुटे, देवकांत बहेकार आदी उपस्थित होते.

### अशा आहेत प्रमुख मागण्या

शासनाने त्वरित जातीनिहाय जनगणना करावी व लोकसंख्येनुसार आरक्षण द्यावे, मराठा आंदोलकांच्या दबावात ओबीसी समाजावर अन्याय करू नये, २ सप्टेंबरला काढण्यात आलेला निर्णय रद्द करण्यात यावा. अशा आदी मागण्या सकल ओबीसी समाज व संघटनांच्या वतीने करण्यात आले आहे.



# काळीमाती येथे अंधश्रद्धा, जातीभेद निर्मूलनकरिता समाज प्रबोधन



**आमगाव :** ग्राम काळिमाती येथील श्री गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने अंधश्रद्धा, जाती भेद, धर्म भेद समूळ नष्ट व्हावे,गाव सुराज्य निर्मिती करिता ग्रामगीता ग्रंथाचे प्रबोधन करण्यात आले.

या वेळी अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रशांत बहेकार, ग्राम अध्यक्ष हरिराम फुंडे, तेजराम भांडारकर, तुकाराम फुंडे, गणेशा फुंडे, मालिकचंद राहणगडाले, येवकराम गिऱ्हेपुंजे, शामराज गिऱ्हेपुंजे, पितांबर शेंडे, शिसूपाल रहांगडाले, ताराबाई तरोने, पुष्पा ब्राम्हणकर, हिरनबाई कुकडीबुरे, निर्मला फुंडे, रामलाल शेंडे, जगतराम फुंडे, चंद्रकांता मेंढे, केसर चुटे, गोपीचंद भांडारकर, रामचंद बहेकार, सुरज रहांगडाले, अंजना भांडारकर, शिसूल रहांगडाले उपस्थित होते. या प्रसंगी लक्ष्मी भजन मंडळ, मीरा भजन मंडळ, बजरंग भजन मंडळाच्या वारकरी सदस्यांनी परिश्रम घेतले. सामाजिक, अध्यात्मिक विषयावर भजन म्हणून प्रबोधन करण्यात आले.

# कुलपा शिवारात वाघाचा संचार; नागरिकांमध्ये भीती

**मुंडीकोटा :** जवळच्या कुलपा शेतशिवारात चरत असलेल्या गायीवर हल्ला करून तिला जंगलात ओढत नेवून वाघाने शिकार केला. या घटनेमुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. नवेझरी गावाजवळील कुलपा शेत शिवारात बुधवारी (दि. ३) दुपारी २ वाजता दिलीप दौलत मलकाम नावाचा शेतकरी दररोजप्रमाणे आपल्या गायी चारत होता. अचानक एका वाघाने गायीवर हल्ला केला. त्या गायीला जंगल परिसरात ओढून नेले. त्यामुळे गायीचा मृत्यू झाला. गायीची अंदाजे किंमत ३५ ते ४० हजार रुपये आहे. वन परिक्षेत्र अधिकारी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली वन विभागाचे संजय अंबुले आणि मनीषा वानखेडे घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पोहोचून गायीचा पंचनामा केला आणि गायीचे शवविच्छेदन केले. वाघाने गायीची शिकार केल्याने गाव परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियानामुळे महिलांचे आरोग्य सुदृढ होणार : डॉ पुरुषोत्तम पटले

**गोंदिया :** केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या वतीने 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान' १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या विशेष उपक्रमाचा उद्देश महिलांचे आरोग्य मजबूत करून कुटुंब सशक्त बनविणे तसेच व्यापक वैद्यकीय सेवा व जनजागृती कार्यक्रम राबविणे हा आहे.



जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांनी माहिती दिली की, 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार या अभियानात महिलांसह किशोरवयीन मुली व बालकांसाठी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासण्या, पोषण जनजागृती आणि वेलनेस समुपदेशन करण्यात येत आहे. तसेच आरोग्य सेवा शिबिरांचे जिल्ह्यात आयोजन करण्यात येणार आहे. याचा सर्व महिलांनी लाभ घ्यावा. उच्च रक्तदाब, मधुमेह व कर्करोग (तोंड, स्तन व गर्भाशय मुख) तपासण्या कॅम्पस आयोजित केले आहेत. 'अशा अभियानांमुळे महिलांचे आरोग्य अधिक मजबूत होते आणि त्यामुळे कुटुंबेही अधिक सशक्त व सक्षम होणार. तसेच वैद्यकीय अधिकारी डॉ. सुवर्णा हुबेकर यांनी सांगितले की, वैद्यकीय सेवांसोबतच जनजागृतीसाठी विशेष उपक्रम राबविले जातील. त्यात विशेषतः शालेय किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छता व पोषण बाबत मार्गदर्शन केले.

# अश्विनसिह गौतम राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्काराने सन्मानित



**अर्जुनी/मोर. :** सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या युवकांचा गौरव करण्याच्या हेतूने शिर्डी येथील क्रांतिसूर्य शेती व शिक्षण विकास संस्था, महाराष्ट्र राज्य आणि श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय भव्य सोहळयाचे आयोजन करण्यात आले. या सोहळयात संपूर्ण महाराष्ट्रातून निवडलेल्या ४१ समाजकार्यकर्त्यांना क्रांतिसूर्य कार्यगौरव 'समाजरत्न' पुरस्कार २०२५ ने गौरविण्यात आले.

या यादीत विदर्भातील गोंदिया, भंडारा, गडचिरोली आणि चंद्रपूर विभागातून कार्यरत युवा समाजसेवक अश्विनसिह गौतम यांची निवड झाली. त्यांनी व्यसनमुक्ती चळवळ, पर्यावरण संवर्धन, बीज संकलन, जलदूत व जलप्रेमी अभियानांतर्गत रेनवॉटर हार्वेस्टिंग जनजागृती, तलाव स्वच्छता व संवर्धन, विकलांग जनसहाय्यता, वृक्षलागवड, सायबर क्राईम व संविधान जनजागृती, मुलींसाठी आत्मरक्षण प्रशिक्षण शिबिरे, आपले उत्सव आपली जबाबदारी अभियान इत्यादी उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन शिर्डी येथील भव्य कार्यक्रमात खासदार भाऊसाहेब वाकचौरे, खासदार निलेश लंके, राष्ट्रीय समाजश्री दीपक दादा पाटील, विधान परिषद सदस्य डॉ. सुधीर तांबे व सत्यजित तांबे, शिक्षणतज्ज्ञ संदीप वाकचौरे, समाजसेविका प्रभावती ताई घोगरे, उद्योगसमूह संस्थापक मुकुंद सिंगर, इशांत सर्व्हिसेस संचालक अविनाश पुलाटे, संस्था अध्यक्ष खंडू बाबाजी सातपुते व सचिव गोरक्ष भवर यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय 'समाजरत्न' पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराने विदर्भातील सामाजिक चळवळीला नवे बळ मिळाल्याची भावना स्थानिक समाजघटकांतून व्यक्त होत आहे.

# २०० खेळाडूंनी घेतला तलवारबाजी स्पर्धेत भाग

**गोंदिया :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद व फेंसिंग असोसिएशनच्या वतीने आयोजित जिल्हास्तरीय शालेय तलवारवाजी क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुलात उत्साहात पार पडली. या स्पर्धेत जिल्ह्यातील २०० खेळाडूंना सहभाग घेतला होता. ईपी, फाइल व सायबर या तीन प्रकारांत ही स्पर्धा घेण्यात आली. पंच म्हणून अतुल बिसेन, अक्षय बनकर, प्रतीक लाडेकर, उज्ज्वल बाणासुरे, राजा नेवारे, शुभम पिसोडे, मंगेश कावरे, भाग्यश्री बनकर, काजल पुराण, आदित्य वैद्य यांनी भूमिका बजावली.स्पर्धेसाठी फेंसिंग असोसिएशनचे अध्यक्ष पुष्कर सावंत, उपाध्यक्ष शैलेंद्र फुंडे, जिल्हा क्रीडा अधिकारी ए. बी. मरसकोल्हे, क्रीडा अधिकारी अभय महल्ले, किशोर तावडे, दीपक शिक्का, तालुका संयोजक विकास कापसे, डॉ. महेंद्र हेमने, क्रीडा शिक्षक विशाल ठाकूर, फलिंद्र मंडे, संतोष बिसेन, चेतन मानकर, जितेंद्र पालांदूरकर, पंकज बोरकर, ओमप्रकाश डोंगरवार, अंकुश गजभिये उपस्थित होते.

# दोन दिवसीय महापरित्रण पाठ व धम्मदेशना



**अर्जुनी मोरगाव :** वर्षावास भाद्रपद पोर्णीमानिमीत्त पवित्रधम्मभुमी तालुक्यातील काळीमाती ७,८ सप्टेंबर ला दोन दिवसीय महापरित्रणपाठ व धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन निसर्गरम्य धम्मभूमी काळीमाती येथे करण्यात आले आहे. दरम्यान भिक्षु संघाचे आगमन होणार आहे.

यामधे भंते पय्यातिष्य महास्थवीर श्रीलंका,भंते सुगतानंद स्थवीर,भंते गुणानंद थेरो,श्रामनेर नागदिप, भंते सच्चक महाथेरो, भंते नंदु स्थवीर, भंते सुमेध नागरत्न थेरो,श्रामनेर आयतन,भंते प्रज्ञानंद महाथेरो,भंते नागसेन,भंते महामोगल्यान यांचा समावेश असुन बौध्द बांधवांना धम्मोपदेश व धम्मदेशना देणार आहेत. सांयकाळी पाच वाजता कार्यक्रमाची सुरवात होईल भोजनदानानंतर रात्री नऊ वाजता धम्मरॅली,व नंतर रात्रभर महापरित्रणपाठ सुरु होईल,आठ सप्टेंबर रोजी सकाळी ६:३० वाजता महापरित्रणपाठ समाप्तीनंतर भिख्खु संघाचे हस्ते धम्मध्वजारोहण संपन्न होईल,सकाळी सात वाजता भिख्खुसंघाना चिवरदान व अष्टपरिस्कार दान,त्यानंतर सकाळी आठ ते अकरा वाजेपर्यंत धम्मदेशना कार्यक्रम होईल. या कार्यक्रमास उपस्थित राहुन महापरित्रणपाठ व धम्मोपदेश व धम्मदेशना चा लाभ घेण्याचे आवाहन महाप्रज्ञा धम्मकानन अनागारिक कल्याणकारी संस्था कालीमाती अर्जुनी-मोर. तथा तालुक्यातील सर्व बौध्द समाज बांधवांनी केले आहे.

# तालुकास्तरीय विज्ञान नाट्यमहोत्सवात विद्यार्थ्यांचे सुयश

**देवरी :** समूह साधन केंद्र येथे ३ सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय विज्ञान नाट्योमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक देवरी येथील छत्रपती शिवाजी हायस्कूल संलग्न कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय विज्ञान नाट्योत्सवामध्ये प्रथम क्रमांक पटकाविला. या नाट्य महोत्सवात छत्रपती शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी सर्वांसाठी स्वच्छता या अंतर्गत ' कर्तव्य' या नाटकाचे सादरीकरण केले.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष गटशिक्षणाधिकारी महेंद्र मोटघरे होते तर नाट्य महोत्सवाचे आयोजक विनय लोथे तर प्रमुख अतिथी गुणवंत कावळे उपस्थित होते. विजयी चमूचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन परिक्षक व मान्यवरांनी केले.या विज्ञान नाट्योत्सवामध्ये आर्यन दहिफळे, आसू नाईक, शिवम गावकर, समीर मेश्राम, कु निवेदिता काशिवार, कु युविका नरेटी, कु मुस्कान रामटेके, कु उन्नती राऊत, हे विद्यार्थी सहभागी होते.तर या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन एम आर तांडेकर यांनी केले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक कृ.स.तं.शि.संस्था अध्यक्ष झामसिंग येरणे, सचिव अनिलकुमार येरण, प्राचार्य एम जी भुरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले.

# सी. जे. पटेल महाविद्यालयात रोजगार मेळावा

**तिरोडा :** स्थानिक सी. जे. पटेल महाविद्यालयामध्ये आज ३ सप्टेंबर २०२५ रोजी कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र मॉडेल करिअर सेंटर, गोंदिया आणि सी. जे. पटेल महाविद्यालय, तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजयभरत सी. शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी प्राचार्य सरांनी समकालीन आर्थिक स्थिती आणि रोजगारांच्या समस्या तसेच रोजगार मेळाव्याच्या अनुषंगाने विविध कंपन्यांद्वारे रोजगाराची संधी, कौशल्य विकास व रोजगार, यावर सहभागी विद्यार्थ्यांना व स्वयंरोजगारांना सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी उपस्थित अभिषेक सिंघाई यांनी महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित रोजगार मेळाव्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. या रोजगार मेळाव्यामध्ये दोनशे स्वयंरोजगारानी सहभाग घेतला व विविध सोळा कंपन्यांच्या माध्यमातून स्वयंरोजगाराची नोंदणी करण्यात आली. या कार्यक्रमाचे संचालन प्रा. विकास आडे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. रवी झोडे यांनी आपल्या प्रस्ताविकेतून रोजगार मेळाव्याचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. किसन गावित यांनी केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा सभा



**तिरोडा :** तिरोडा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आढावा बैठक माजी खासदार खुशालचंद्र बोपचे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी आमदार तथा जिल्हा अध्यक्ष चरणभाऊ वाघमारे तसेच युवा नेते रविकांत बोपचे यांच्या प्रमुख उपस्थितीत ३१ ऑगस्ट रोजी झारिया सभागृहात संपन्न झाली.

या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, विधानसभा निवडणुकीतील मतांची चोरी व पुढील काळात मतचोरी रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही, स्थानिक प्रश्न आणि पक्ष संघटन बळकट करण्याचे धोरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. उषा शामकुल यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश या बैठकीत पक्षाचे सर्वेसर्वा आदरणीय शरदचंद्र पवार यांच्या शिव - शाहू - फुले - आंबेडकर विचारांवर व पक्षाच्या ध्येयधोरणावर विश्वास ठेवत श्रीमती उषा रविंद्र शामकुल यांनी पक्षात प्रवेश केला. प्रासंगिक माजी खासदार खुशालचंद्र बोपचे साहेब, चरणभाऊ वाघमारे तसेच युवा नेते रविकांत बोपचे यांनी पक्षाचा दुपट्टा घालून विधिवत प्रवेश दिला.

बैठकीत मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पक्षावरील निष्ठा दाखवून दिली. संघटन मजबूत करण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी सर्वश्री तालुका अध्यक्ष कैलाश पटले, ओमप्रकाश रहांगडाले, नासिर घाणीवाला, युवराज शहारे, महिला तालुका अध्यक्षा भाग्यश्री केळवतकर, आशिष येरपुडे, एम. डी. पटले, हंसराज आगाशे, रजनीकांत शरणागत यांच्यासह भोजराज उईके, उमाशंकर पटले, नंदूभाऊ उके, सरपंच रवींद्र भगत, छायाताई टेकाम, मंदाताई टेंभरे, उर्मिला पटले, रंजित वालदे, विश्वनाथ बिसेन, कोठीराम निशाणे आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# काठीने मारून केले जखमी

**गोंदिया :** गोरेगाव पोलिस ठाण्यातंर्गत मुंडीपार येथे जेवणासाठी तु विचारणारा कोण ? यावरून सुरू झालेल्या वादात दोन आरोपींनी फिर्यादीला काठीने मारून जखमी केले. ही घटना १ सप्टेंबर रोजीची आहे. फिर्यादी ज्ञानेश्वर मनिराम राऊत (३७) रा.मुंडीपार हा गावातील उमराव चौधरी यांच्याकडे जेवणाकरीता गेला होता.

दरम्यान आरोपी रिमचंद नोनीराम कटरे (४५) हा त्या ठिकाणी आला. यावर फिर्यादीने त्याला जेवणाकरीता विचारले. मला जेवणाकरीता विचारणारा तु कोण ? असे बोलून आरोपीने वाद निर्माण केला. त्यातच आरोपीचा मुलगा हर्ष रिमचंद कटरे (२०) हा त्या ठिकाणी येवून काठीने फिर्यादीला मारहाण करून जखमी केले.

# प्राथ. आरोग्य केंद्र सुकडी/डाक येथे १११ नागरिकांनी तापसणी

**तिरोडा :** सार्वजनिक आरोग्य विभागाने मोबाईल कर्करोग तपासणी व्हॅन जिल्ह्यात २१ ऑगस्टपासुन विविध ७ ठिकाणी आरोग्य संस्थामध्ये कर्करोग तपासणी शिबीरे झाली आहे. आरोग्य विभागाने जिल्ह्यातील आठही तालुक्यातील ३३ आरोग्य संस्थेतील गावात मोबाईल कर्करोग तपासणी व्हॅन द्वारे महिला व पुरुषांची मोफत तपासणी करण्यात येणार असल्याची माहीती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले यांनी दिली आहे. त्या अनुषंगाने २ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सुकडी/डाक येथे कर्करोग तपासणी शिबिरात १११ नागरिकांची कर्करोग तपासणी तकरण्यात आली.




या व्हॅनद्वारे शहरासह ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांची मोफत कर्करोग तपासणी केली जात आहे.प्राथमिक आरोग्य केंद्रे व ग्रामीण रुग्णालयांना भेट देऊन एका दिवसात शंभरहून अधिक रुग्णांची तपासणी करण्याची क्षमता या व्हॅनमध्ये आहे १ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र बेरडीपार येथे १०२ लाभार्थी यांची तपासणी करण्यात आली. २ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सुकडी/डाक येथे कर्करोग तपासणी शिबीर पार पडले.

यावेळी १११ नागरिकांची तापसणी करण्यात आली. त्यात ६५ मुख कर्करोग, ३७ महिलांची गर्भाशय कर्करोग व ९ महिलांची स्तन कर्करोग संबधाने तपासणी केल्याची माहीती वैद्यकिय अधिकारी डॉ.शिवकुमार हरीणखेडे यांनी यावेळी दिली आहे. शिबिरात स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ.सविता लोणेर, मुखरोग तज्ज्ञ डॉ.अनिल आटे व शल्यचिकित्सक डॉ.तुषार डहाके, स्टाफ नर्स प्रिती वडीचार, श्रद्धा बोरकर, पल्लवी रामटेके, नैकाणे व ठवकर यांनी लाभार्थ्यांची विविध तपासणी केली.

कॅन्सर तपासणी शिबीर तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दर्शना नंदागवळी,वैद्यकीय अधिकारी डॉ.शिवकुमार हरीणखेडे व डॉ.रोशन मलेवार यांचे मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले होते.

कॅन्सर तपासणी शिबिराला पदाधिकारी ग्राम सुकडीचे सरपंच सुनिल मेश्राम यांनी भेट देवुन पाहणी केली आणि यावेळी अधिकाधिक नागरिकांनी आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन याप्रसंगी केले. आरोग्य सहाय्यक विजय मेश्राम , आरोग्य सहायिका धाबर्डे यांचे सह प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आशा सेविका, परिचर व इतर सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या मदतीने व जाणभागीदारीने हे कर्करोग तपासणी शिबीर यशस्वी रित्या पार पडले.

